| | |
|---|---|
| MHNG180001512026 | **निशाणी क्र. १ वर आदेश** |

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार जयसिंग रामाजी धोटे हा सावनेर येथील रहिवासी असून ते मृतक श्रीमती नानुबाई रामाजी धोटे उर्फ नानुबाई संतोषराव धोटे हिचा भाउ आहे. श्रीमती नानुबाई रामाजी धोटे उर्फ नानुबाई संतोषराव धोटे यांचा मृत्यू दिनांक १३.०६.२०१९ रोजी काटोल येथे झाला. त्यांचे पती नामे संतोष विठोबाजी कडू हे दिनांक २०.०१.२०१७ रोजी मरण पावले तर त्यांचा मुलगा हेमराज संतोषराव कडू याचा मृत्यू दिनांक ११.१०.२०१२ रोजी काटोल येथे अविवाहीत असताना झाला. अर्जदार व मृतक बहीण नानुबाई उर्फ नानी यांच्या संयुक्त नावाने मौजा निळगांव, सर्व्हे नं. २३२, आराजी १.४३ हे.आर. जमा, रुपये ११.६५, भो.व. १ ही शेतजमीन असून मृतक नानुबाई यांना तिच्या सासरचे कोणतेही वारसान नसल्याने अर्जदार हे तिचे एकमेव वारस आहेत. म्हणून त्यांनी हा अर्ज सादर केलेला आहे.

३. प्रकरणात अर्जदारातर्फे नोंदविण्यात आलेल्या पुराव्याचे व दस्तऐवजांचे अवलोकन करता पुढील मुद्दे या न्यायालयाचे समक्ष आदेशासाठी उपस्थित झाले. ते मुद्दे व त्याबाबत करण्यात आलेल्या चर्चेला अनुसरुन निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे सिद्ध करतो काय की, त्यांचा अर्ज : मंजूर होण्यास पात्र आहेत काय ? | **होय.** |

२. आदेश काय ? : **अंतिम आदेशाप्रमाणे.**

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीता** –

**४.** प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर या अर्जाबाबत नि. क्र. १ वरील आदेशान्वये नोटीस व जाहीरनामा काढण्याबाबत आदेशीत करण्यात आले. त्यानुसार पुण्य नगरी वृत्तपत्रामध्ये जाहीरनामा प्रकाशीत करण्यात आला. सदरहु जाहीरनाम्याबाबत आजपावेतो कोणीही आक्षेप, उजर व हरकत नोंदविलेली नाही तसेच कोणीही हजर झालेले नाही.

**५** अर्जदाराच्या विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचा युक्तीवाद नि.क्र. १ प्रमाणे तसेच अभिलेखावर उपलब्ध असलेल्या पुराव्याप्रमाणे केला. अंतिमतः त्यांनी असे नमूद केले की, आजपावेतो जाहीरनाम्यास कोणीही आक्षेप, उजर व हरकत नोंदविली नाही म्हणून अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

**६.** अर्जदाराने प्रस्तुत अर्जात केलेली कथने नाकारण्यासाठी कोणत्याही प्रकारची हरकत आजपर्यंत न्यायालयासमोर आलेली नाही. तसेच अन्य कोणताही इसम मृत व्यक्तीचा वारस असल्याचा दावा करण्याकरीता हजर झालेला नाही, अगर कोणताही आक्षेप, उजर तथा हरकत नोंदविण्यात आलेली नाही.

**७.** प्रस्तुत अर्जाबाबत अर्जदार जयसिंग रामाजी धोटे यांनी साक्षीदार क्र.१ म्हणुन नि.क्र. ८ प्रमाणे स्वतःचा पुरावा प्रतिज्ञापत्रावर सादर केलेले आहे व सदरहू पुरावा आजपावेतो अबाधीत असून त्याला कोणीही आव्हान दिले नाही. तसेच साक्षीदार क्र. २ कमलाकर कृष्णराव पुंड यांनी देखील त्यांचा पुराव्याचे

प्रतिज्ञपत्र नि.क्र. ०९ वर दाखल करुन अर्जदार जयसिंग रामाजी धोटे यांच्या कथनाला पुष्टी दिलेली आहे.

८. अर्जदारांनी पुराव्यासोबत खालील दस्तऐवज दाखल केलेले आहे;–

| अ. क्र. | कागदपत्रांचे विवरण | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | नानुबाई संतोषराव कडू यांच्या मृत्युप्रमाणपत्राची मुळ प्रत | १० |
| २. | संतोष विठोबाजी कडू यांच्या मृत्युप्रमाणपत्राची मुळ प्रत | ११ |
| ३. | हेमराज संतोषरावजी कडू यांच्या मृत्युप्रमाणपत्राची मुळ प्रत | १२ |
| ४. | अर्जदार जयसिंग रामाजी धोटे यांच्या आधारकार्डची पडताळीत प्रत | १३ |
| ५. | भुमापन क्र. २३२ मौजा निळगाव, ता. कळमेश्वर चा ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत | १४ |
| ६. | नानी रामाजी धोटे यांइच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची मुळ प्रत | १५ |
| ७. | दि. २१.०२.२०२६ रोजी पुण्य नगरी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द जाहीरनामा | १६ |

९. मयत नानुबाई हिच्या सासरकडून कोणीही हजर झालेले नाही. त्यामुळे उपरोक्त परिस्थितीत प्रस्तुत अर्जदार हे मृतक श्रीमती नानुबाई रामाजी धोटे उर्फ नानुबाई संतोषराव कडू यांचे कायदेशीर वारस आहे असा वारस दाखला देण्यास कोणताही अडथळा दिसून येत नाही. करीता मुद्दा क्र.१ साठी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करीता –**

**१०.** मुद्दा क्र.१ करीता होकारार्थी निष्कर्ष नोंदविल्यामुळे मुद्दा क्र.२ च्या उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार हे मयत श्रीमती नानुबाई रामाजी धोटे उर्फ नानुबाई संतोषराव कडू यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र योग्य ते न्यायालयीन शुल्क घेतल्यानंतर देण्यात यावे.

RAVINDRA RATHOD
Digitally signed by RAVINDRA RATHOD
Date: 2026.05.04 16:08:44 +0530

( आर.एल. राठोड)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कळमेश्वर, जि. नागपूर.

कळमेश्वर.
दिनांक : ०४.०५.२०२६

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करते की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेश हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव –श्रीमती आर. एम. परमाल (ग्रेड – ३)